

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in

## अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/ 8540 दि. 20 NOV 2021

## सुधारित पत्र

प्रति
१) मा. प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित महाविद्यालये
२) मा. संचालक, विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय :- **Introduction of NCC Study as Elective Subject Maharashtra.**
संदर्भ :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे जा.क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१३३/विशि-३ दि.०६/०९/२०२१ रोजीचे पत्र.
२) विद्यापीठाचे जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/७११३ दि.२२/०९/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१५ एप्रिल, २०२१ व दि. ०९ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये "NCC Studies" हा अभ्यासक्रम वैकल्पिक विषय म्हणून राबविण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना विद्यापीठास दिल्या आहेत.

त्यास अनुसरून अभ्यासमंडळे विभागाकडून सर्व कार्यालयीन प्रक्रीया पूर्ण करून NCC as General Elective Credit Course चा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देवून, विद्यापीठाचे जा.क्र.पुअहोसोविसो /अमंवि/२०२१/५८४४ दि.१२/०८/२०२१ नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुलांना कळविण्यात आले होते. तसेच NCC as General Elective Credit Course महाविद्यालयाच्या माहिती पत्रिकेत समाविष्ठ करण्याबाबत दि.१४/०८/२०२१ रोजीच्या ई-मेल अन्वये आपणास कळविण्यात आले होते.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने NCC Studies हा वैकल्पिक विषय म्हणून राबविण्याकरिता NCC या अस्थायी अभ्यासमंडळाची बैठक दि.१४/०९/२०२१ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या ठराव क्र. २ नुसार आवश्यक सूचना संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये आपणास कळविण्यात आल्या होत्या. परंतू सदर विषय Admission प्रक्रीयेच्या Software मध्ये समाविष्ठ करण्यासाठी परीक्षा विभागास अडचण निर्माण झाल्याने दि.१५/११/२०२१ रोजी तातडीने NCC या अभ्यासमंडळाची बैठक विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर अभ्यासमंडळाने या बैठकीत ठराव क्र २ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. २ | १) | बी.ए. भाग-१ व बी.ए.बीएड. भाग-१ दुसऱ्या आवश्यक विषयामध्ये (II Compulsory Subject) ग्रुपमध्ये NCC Studies विषय समाविष्ठ करावा. |
| | २) | बी.कॉम भाग-१ G.E. I ग्रुप A मध्ये NCC Studies विषय घ्यावा. Maths/Insurance/Commercial Geography/NCC Studies Paper घ्यावा. |
| | ३) | B.Sc/B.Sc.B.Ed/B.Sc.(Ecs)/BCA/BBA & B.A.LLb Part-I (Sem. I & II) साठी Add on Subject म्हणून NCC Studies विषय घेण्यात यावा. |
| | ४) | NCC Studies हा विषय Sem. I व II साठी ५० गुणांचा असेल. त्यामध्ये UA 40 गुण (Theory 20 |

| | | |
|---|---|---|
| | | Marks & UA Practical 20 Marks तसेच CA 10 Marks) असे एकूण ५० गुणांचा पेपर असेल. |
| | ५) | सदर NCC Studies या विषयाचा अभ्यासक्रम CBCS Pattern प्रमाणे अभ्यासमंडळाव्दारे तयार करण्यात आलेला आराखडा व पाठयक्रम विद्यापरिषदेमध्ये मान्यता असल्यामुळे सदर अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यास व संबंधित महाविद्यालयांना कळविण्याच्या कार्यवाहीस या अभ्यासमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. |

## NCC Studies (Sem. I & II)

| Unit | Syllabus (Theory) | Lectures |
|---|---|---|
| 1 | NCC General | 6 |
| 2 | National Integration & Awareness | 4 |
| 3 | Personality Development | 3 |
| 4 | Social Service & Community Development | 3 |
| | Total Lectures | 16 |
| | **Syllabus (Practical)** | |
| 1 | Drill | 12 |
| 2 | Field Craft & Battle Craft | 3 |
| 3 | Map Reading | 3 |
| 4 | Weapon Training | 5 |
| 5 | Social Service & Community Development | 5 |
| | Total Periods | 28 |
| | **Total Credit Points : 4 Credits** | |
| | **Assessment: 50 Marks** | |
| | **C.A. : 10 Marks** | |
| | **U.A. Theory : 20 Marks**<br>**Practical : 20 Marks** | |

उपरोक्त सूचना विचारात घेवून NCC as General Elective Credit Course हा वैकल्पिक विषय सुरु करण्याची कार्यवाही व्हावी, ही विनंती.

तसेच यापूर्वीचे विद्यापीठाचे जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/७११३ दि.२२/०९/२०२१ रोजीचे पत्र रद्द समजण्यात यावे.

(डॉ. सु. कि. पवार)
प्र. कुलसचिव

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव :-
१) मा. प्र.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, पुअहोसोविसो
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुअहोसोविसो
३) मा. अध्यक्ष, NCC अभ्यासमंडळ, पुअहोसोविसो
४) मा. संचालक, इनडीड डिजीटल, व्दारा पारितोष शर्मा, २०१, गुरुकृपा सोसायटी, केशव नगर, पुणे-४११०३६